# " महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम नाहिसे करणेबाबत प्रारुप अधिनियम, २०२६" च्या अनुषंगाने सूचना व हरकती मागविणेबाबत.

१) सदर प्रारुप अधिनियमाचा इंग्रजी व मराठी मसूदा यासोबत जोडला आहे.

२) सदर प्रारुप अधिनियमाबाबत आपल्या सूचना व हरकती आपल्याशी संबंधित तहसीलदार अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे लेखी स्वरुपात सादर कराव्यात.

३) सदर प्रारुप अधिनियम अंतिम करण्यापूर्वी, केवळ संबंधित तहसीलदार अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दिनांक १४ सप्टेंबर, २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत लेखी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या सूचना व हरकतींचाच विचार करण्यात येईल.

सदर अधिनियमाचे इंग्रजी प्रारुप पृष्ठ १ ते ५ येथे जोडले आहे.

सदर अधिनियमाचे मराठी प्रारुप पृष्ठ ६ ते १२ येथे जोडले आहे.

**THE MAHARASHTRA GRAMDAN (ABOLITION) BILL, 2026**

ARRANGEMENT OF SECTIONS

**CHAPTER I: PRELIMINARY**

1. Short title, extent, and commencement.
2. Definitions.

**CHAPTER II**

**DISSOLUTION OF GRAM DAN MANDALS AND APPLICATION OF LOCAL SELF-GOVERNMENT LAWS**

1. Repeal of the principal Act and dissolution of Gram Dan Mandals.
2. Application of laws relating to Local Self-Government.

**CHAPTER III**

**TITLE TO LANDS, IMPLEMENTATION OF REVENUE CODE, AND TRANSFERS**

1. Restoration of original tenure and conferment of ownership rights over lands.
2. Provisions regarding transferred lands.
3. Application of provisions of the Revenue Code and assessment of land revenue.
4. One-time exemption from the Fragmentation Act.
5. Classification of public and common lands.

**CHAPTER IV**

**DISPUTE REDRESSAL, LIMITATION, AND APPEALS**

1. Dispute redressal powers of the Collector and period of limitation.
2. Provision for appeal to the Divisional Commissioner and revision by State Government.

**CHAPTER V**

**MISCELLANEOUS (FINANCIAL AND OTHER SAVINGS)**

1. Protection of bank encumbrances, charges, or mortgage rights.
2. Total exemption from registration fees and stamp duty.
3. Pending legal proceedings and suits.
4. Power to remove difficulties and to make rules.

## PREAMBLE

WHEREAS, it is expedient to provide for the establishment of Gramdan villages in pursuance of the Gramdan movement started by Acharya Vinoba Bhave, and for the constitution of Gram Dan Mandals for that purpose and matters connected therewith, the Maharashtra Gramdan Act, 1964 was enacted;

AND WHEREAS, in the present circumstances, owing to changing social, economic, and administrative conditions, as well as simplification in revenue and land management, the relevance and utility of the said Act have ceased to exist;

AND WHEREAS, for administrative convenience and as part of the policy to repeal obsolete laws, it is necessary and expedient to repeal the said Act;

BE it enacted by the Maharashtra State Legislature in the Seventy-seventh Year of the Republic of India as follows:—

## CHAPTER I

## PRELIMINARY

1. Short title, extent, and commencement.—

(1) This Act may be called the Maharashtra Gramdan (Abolition) Act, 2026.

(2) It extends to the whole of the State of Maharashtra.

(3) It shall come into force on such date as the State Government may, by notification in the Official Gazette, appoint (hereinafter referred to as the "appointed day").

2. Definitions.—

In this Act, unless the context otherwise requires,—

(a) "principal Act" means the Maharashtra Gramdan Act, 1964 (Mah. XXIII of 1965);

(b) "Gram Dan Mandal" means a Gram Dan Mandal constituted under section 9 of the principal Act;

(c) "Gramdan land" means land entrusted to a Gram Dan Mandal under the principal Act, or granted by the Gram Dan Mandal to any person for cultivation or any other purpose under section 26 of the principal Act;

(d) "Collector" means the Collector of the concerned district, and includes any officer not below the rank of an Additional Collector authorized by him;

(e) "laws relating to Local Self-Government" means the Maharashtra Village Panchayats Act, 1958 and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961;

(f) "Code" means the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966).

## CHAPTER II

## DISSOLUTION OF GRAM DAN MANDALS AND APPLICATION OF LOCAL SELF-GOVERNMENT LAWS

3. Repeal of the principal Act and dissolution of Gram Dan Mandals.—

(1) With effect from the appointed day, the Maharashtra Gramdan Act, 1964 (Mah. VII of 1965) is hereby repealed.

(2) All Gram Dan Mandals constituted under the principal Act shall stand dissolved with effect from the appointed day.

4. Application of laws relating to Local Self-Government.—

(1) The entire territory falling within the jurisdiction of the dissolved Gram Dan Mandals shall, with effect from the appointed day, be subject to the provisions of the Maharashtra Village Panchayats Act, 1958 and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.

(2) The State Government shall, by issuing an official notification, include the former Gramdan areas into the contiguous Gram Panchayat, or establish a new Gram Panchayat in accordance with the population criteria.

(3) Excepting the lands referred to in Chapter III, all movable and immovable properties (excluding ownership rights of private and public lands), funds, and liabilities of the Gram Dan Mandals shall stand transferred to the concerned Gram Panchayat or Zilla Parishad, as the case may be.

## CHAPTER III

## TITLE TO LANDS, IMPLEMENTATION OF REVENUE CODE, AND TRANSFERS

5. Restoration of original tenure and conferment of ownership rights over lands.—

(1) The lands which were transferred to the Gram Dan Mandal under the principal Act shall be restored and granted to the original farmers concerned or their legal heirs, along with the same tenure (Tenure/Class) as recorded in the revenue records prior to the enforcement of the principal Act.

(2) Where lands under the principal Act have been granted to landless persons or groups of landless persons, such lands shall be granted to the landless persons or groups of landless persons or, as the case may be, their legal heirs under Occupant Class-II tenure.

(3) While restoring or returning such lands, the provisions of the tenancy laws, the land ceiling laws, and other land-related prevailing laws shall continue to apply.

(4) Upon determination of the rights over the lands leased under the principal Act, mutation of records, issuance of record certificates, entry of mutations of succession, and updating of maps and e-records shall be carried out.

(5) The Tahsildar of the concerned area shall verify the land records and old revenue records (7/12 extract or Record of Rights pertaining to the pre-Gramdan period), determine the original tenure of the land, and mutate the current revenue records accordingly.

6. Provisions regarding transferred lands.—

(1) If land granted under the principal Act has been transferred to another person by a registered transaction prior to the appointed day, and such person is currently in actual possession and enjoyment of the said land, the Collector shall hold an inquiry into such transfer.

(2) If the Collector is satisfied that such transfer was permissible under the Maharashtra Gramdan Act, 1964 and was made for valuable consideration, the Collector shall regularize such transfer.

(3) If the transfer of land was not permissible under the principal Act, the land shall be regularized in favor of the transferee under Occupant Class-II tenure upon payment of such premium (Nazrana) as may be determined by the Government.

7. Application of provisions of the Revenue Code and assessment of land revenue.—

(1) Consequent upon completion of the proceedings under sections 5 and 6 of this Act, all general provisions of the Code and rules made thereunder (such as non-agricultural use, mutation process, quasi-judicial proceedings, etc.) shall apply mutatis mutandis to the Gramdan lands in the Gramdan area.

(2) Any tax or cess previously levied on these lands by the Gram Dan Mandal shall cease to exist. With effect from the appointed day, land revenue as assessed under the provisions of the Revenue Code shall be levied on these lands and shall be collected by the Revenue Department.

8. One-time exemption from the Fragmentation Act.—

Where the Gram Dan Mandal has made small fragments during the allotment or partition of lands in the past, such lands shall be granted a one-time special exemption from the provisions of the 'Maharashtra Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act, 1947', so as to lawfully complete the revenue entries.

9. Classification of public and common lands.—

All lands within the erstwhile Gramdan areas which, prior to the commencement of this Act, are being used for public purposes (such as roads, public wells, playgrounds, community halls, cremation grounds, grazing lands/Gairan) and lands vested in the Gram Dan Mandal, shall vest in the concerned Gram Panchayat for public use.

## CHAPTER IV

## DISPUTE REDRESSAL, LIMITATION, AND APPEALS

10. Dispute redressal powers of the Collector and period of limitation.—

(1) If any question or dispute arises under this Act regarding the eligibility of land, hereditary rights, distribution of ownership rights, determination of original tenure, or validity of transfers, the aggrieved party may make an application to the Collector.

(2) Any such application or claim shall mandatory be submitted to the Collector within such period from the date of commencement of this Act (the appointed day) as may be prescribed by the Government.

(3) The Collector shall, after giving the concerned parties a reasonable opportunity of being heard, pass a definitive order deciding such questions. The proceedings before the Collector shall be deemed to be quasi-judicial proceedings.

11. Provision for appeal and revision.—

(1) Any person aggrieved by any order passed by the Collector under section 10 may, within ninety days from the date of receipt of such order, prefer an appeal before the Divisional Commissioner.

(2) The decision of the Divisional Commissioner in such appeal shall be final and shall not be called in question in any Civil Court:

Provided that, the State Government shall retain the power to call for and examine the records of any order passed by the Collector or the Divisional Commissioner in revision.

## CHAPTER V

## MISCELLANEOUS (FINANCIAL AND OTHER SAVINGS)

12. Protection of bank encumbrances, charges, or mortgage rights.—

Notwithstanding any change in the ownership rights or land tenure under this Act, all valid encumbrances, charges, or mortgage rights of banks, financial institutions, or co-operative societies existing on the concerned lands prior to the appointed day shall remain intact and unaffected, and their rights regarding recovery of loans shall not be prejudiced.

13. Total exemption from registration fees and stamp duty.—

For the purpose of implementation of this special repeal Act, the concerned parties shall be completely exempted from the payment of stamp duty and registration fees for mutation or registration of names in the revenue records (7/12 extract) of the concerned lands from the Gram Dan Mandal to the original farmers or their legal heirs, or to the transferees or their heirs in case of transferred lands.

14. Pending legal proceedings and suits.—

All legal suits, claims, or appeals initiated by or against a Gram Dan Mandal prior to the appointed day shall not abate, but shall be continued and prosecuted by or against the concerned Local Self-Government institution (Gram Panchayat or Zilla Parishad).

15. Power to remove difficulties and to make rules.—

The State Government shall have the power to make rules, by notification in the Official Gazette, for carrying out the purposes of this Act.

*****

## महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम नाहिसे करणेबाबत प्रारुप अधिनियम, २०२६

### अनुक्रमणिका


**प्रकरण १: प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ

२. व्याख्या

**प्रकरण २: ग्राम मंडळांचे विसर्जन आणि स्थानिक स्वराज्य संस्था लागू करणे**

३. मूळ अधिनियमाचे निरसन आणि ग्राम मंडळांचे विसर्जन

४. स्थानिक स्वराज्य संस्था संबंधित कायदे लागू करणे

**प्रकरण ३: जमिनींचे मालकी हक्क, महसूल संहितेची अंमलबजावणी आणि हस्तांतरण**

५. जमिनींचा मूळ धारणधिकार पूर्ववत करणे व मालकी हक्क प्रदान करणे

६. हस्तांतरित झालेल्या जमिनींबाबत तरतूद

७. महसूल संहितेच्या तरतुदी आणि जमीन महसूल लागू करणे

८. तुकडेबंदी कायद्यातून एकवेळची सूट

९. सार्वजनिक आणि सामूहिक जमिनींचे वर्गीकरण

**प्रकरण ४: वाद निवारण, कालमर्यादा आणि अपील तरतूद**

१०. जिल्हाधिकाऱ्यांचे वाद निवारण अधिकार आणि कालमर्यादा

११. राज्य शासनाकडे अपीलाची तरतूद

**प्रकरण ५: संकीर्ण तरतुदी (वित्तीय व इतर संरक्षण)**

१२. बँकांचे बोजा किंवा गहाण हक्क सुरक्षित ठेवणे

१३. नोंदणी शुल्क आणि मुद्रांक शुल्कात पूर्ण सूट

१४. प्रलंबित कायदेशीर बाबी आणि खटले

१५. अडचणी दूर करण्याचा आणि नियम करण्याचा अधिकार


******

ज्याअर्थी, आचार्य विनोबा भावे यांनी सुरु केलेल्या ग्रामदान चळवळीस अनुसरुन ग्रामदान गावांची स्थापना करणे, व त्याकरिता ग्राममंडळाची रचना करण्यासाठी आणि तत्संबंधित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट असल्याने महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४ करण्यात आला होता;

आणि ज्याअर्थी, सद्यस्थितीत बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय परिस्थितीमुळे तसेच महसूल व भूमी व्यवस्थापनातील सुलभीकरणामुळे सदर अधिनियमाची प्रासंगिकता व उपयुक्तता संपुष्टात आली आहे;

आणि ज्याअर्थी, प्रशासकीय सुलभतेसाठी आणि कालबाह्य कायदे रद्द करण्याच्या धोरणाचा एक भाग म्हणून सदर अधिनियम निरसित करणे आवश्यक व इष्ट आहे;

त्याअर्थी, भारतीय प्रजासत्ताकाच्या सत्याहत्तराव्या (७७ व्या) वर्षी महाराष्ट्र राज्य विधानमंडळाने खालीलप्रमाणे हा अधिनियम संमत केला आहे:-

## प्रकरण १

## प्रारंभिक

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ:**

(१) या अधिनियमास " महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम नाहिसे करणेबाबत अधिनियम, २०२६" असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू राहील.

(३) शासकीय राजपत्रातील (Gazette) प्रकाशनाच्या दिनांकापासून हा अधिनियम लागू होईल (ज्याला पुढे "नियत दिनांक" असे संबोधले जाईल).

**२. व्याख्या:**

**या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरी व्याख्या अभिप्रेत नसेल तर:**

(क) "मूळ अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४ (१९६५ चा महा.२३).

(ख) "ग्राम मंडळ" म्हणजे मूळ अधिनियमाच्या कलम ९ अन्वये स्थापन झालेले ग्राम मंडळ.

(ग) "ग्रामदान जमीन" म्हणजे मूळ अधिनियमांतर्गत ग्राम मंडळाकडे सोपवलेली किंवा ग्राम मंडळाने कोणत्याही व्यक्तीला शेतीसाठी वा इतर कारणासाठी मूळ अधिनिमाच्या कलम २६ अन्वये प्रदान केलेली जमीन.

(घ) "जिल्हाधिकारी" म्हणजे संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अपर जिल्हाधिकारी पेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही अधिकारी.

(ङ) "स्थानिक स्वराज्य संस्था संबंधित कायदे" म्हणजे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१.

(च) "संहिता" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१).

## प्रकरण २: ग्राम मंडळांचे विसर्जन आणि स्थानिक स्वराज्य संस्था लागू करणे

**३. मूळ अधिनियमाचे निरसन आणि ग्राम मंडळांचे विसर्जन:**

(१) नियत दिनांकापासून, महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४ (१९६५ चा महा. ७) याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) मूळ अधिनियमांतर्गत स्थापन झालेली सर्व ग्राम मंडळे नियत दिनांकापासून विसर्जित झाल्याचे मानले जाईल.

**४. स्थानिक स्वराज्य संस्था संबंधित कायदे लागू करणे:**

(१) विसर्जित झालेल्या ग्राम मंडळांच्या अखत्यारीत असलेला संपूर्ण भूप्रदेश, नियत दिनांकापासून, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या तरतुदींच्या अधीन राहील.

(२) राज्य शासन, शासकीय अधिसूचना जारी करून, सदर अधिनियम लागू होण्यापूर्वीच्या ग्रामदान क्षेत्रांचा समावेश नजीकच्या ग्रामपंचायतीमध्ये करेल किंवा लोकसंख्येच्या निकषानुसार नवीन ग्रामपंचायत स्थापन करेल.

(३) प्रकरण ३ मध्ये नमूद केलेल्या जमिनी खेरीज करुन ग्राम मंडळांची सर्व जंगमे व स्थावरे मालमत्ता (खाजगी व सार्वजनिक जमिनींचे मालकी हक्क वगळून), निधी, आणि दायित्वे संबंधित ग्रामपंचायत किंवा जिल्हा परिषदेकडे वर्ग होतील.

**प्रकरण ३: जमिनींचे मालकी हक्क, महसूल संहितेची अंमलबजावणी आणि हस्तांतरण**

**५. जमिनींचा मूळ धारणधिकार पूर्ववत करणे व मालकी हक्क प्रदान करणे:**

(१) मूळ अधिनियमांतर्गत ज्या जमिनी ग्राम मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आल्या होत्या, त्या जमिनींचा मूळ अधिनियम लागू होण्यापूर्वीचा जो धारणाधिकार (Tenure/Class) महसूल अभिलेखात नोंदवला होता, त्याच धारणाधिकारासह त्या जमिनी संबंधित मूळ शेतकरी किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना प्रदान करण्यात येतील.

(२) मूळ अधिनियमांतर्गत ज्या जमिनी भूमिहीन व्यक्तींना अथवा भूमिहीन व्यक्तींच्या गटांना प्रदान करण्यात आल्या असतील तर, त्या जमिनी भूमिहीन व्यक्तींना अथवा भूमिहीन व्यक्तींच्या गटांना यथास्थिती त्यांच्या कायदेशीर वारसांना भोगवटादार वर्ग-२ धारणाधिकारात प्रदान करण्यात येतील.

(३) अशा जमिनी परत करताना कुळ कायदा, कमाल जमीन धारणा (सिलिंग) कायदा व अन्य प्रचलित जमीन विषयक कायद्यातील तरतुदी लागू राहतील.

(४) मूळ अधिनियमानुसार पट्ट्याने दिलेल्या जमिनीवरील हक्क निश्चित झाल्यानंतर अभिलेख दुरुस्ती, अभिलेख प्रमाणपत्र देणे, वारसा नोंदी करणे, नकाशे व ई-रेकॉर्ड अद्ययावत केले जाईल.

(५) संबंधित क्षेत्राचे तहसीलदार हे भूमी अभिलेख आणि जुन्या महसूल नोंदी (ग्रामदान पूर्व काळातील ७/१२ किंवा हक्क नोंदणी पत्रक) तपासून, जमिनीचा मूळ धारणाधिकार निश्चित करतील आणि त्याप्रमाणे चालू महसूल अभिलेखात नोंद करतील.

**६. हस्तांतरित झालेल्या जमिनींबाबत तरतूद:**

(१) जर मूळ अधिनियमांतर्गत प्रदान केलेली जमीन नियत दिनांकापूर्वी नोंदणीकृत व्यवहाराद्वारे, इतर व्यक्तीला हस्तांतरित झाली असेल आणि ती व्यक्ती सध्या त्या जमिनीचा प्रत्यक्ष उपभोग घेत असेल, तर जिल्हाधिकारी अशा हस्तांतरणाची चौकशी करतील.

(२) जर असे हस्तांतरण महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४ अन्वये अनुज्ञेय असल्याचे आणि योग्य मोबदला देऊन झाले असल्याची जिल्हाधिकारी यांची खात्री पटल्यास, जिल्हाधिकारी असे हतांतरण नियमित ठरवेल.

(३) मूळ अधिनियमानुसार जमिनीचे हतांतरण अनुज्ञेय नसेल तर, शासन निश्चित करेल त्याप्रमाणे नजराणा आकारुन जमीन हस्तांतरित झालेल्या व्यक्तीकडे जमिनीचे असे हस्तांतरण भोगवटादार वर्ग-२ धारणाधिकारात नियमित करुन देईल.

**७. महसूल संहितेच्या तरतुदी आणि जमीन महसूल लागू करणे:**

(१) सदर अधिनियमाच्या कलम ५ व ६ नुसार कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ग्रामदान क्षेत्रातील ग्रामदान जमिनींना संहितेच्या आणि त्याखालील नियमांच्या सर्व सर्वसाधारण तरतुदी (जसे की बिनशेती वापर, फेरफार प्रक्रिया, अर्धन्यायिक प्रक्रिया इ.) जशाच्या तशा लागू होतील.

(२) या जमिनींवर यापूर्वी ग्राम मंडळाकडून आकारला जाणारा कोणताही कर किंवा उपकर संपुष्टात येईल. नियत दिनांकापासून, या जमिनींवर महसूल संहितेच्या तरतुदींनुसार ठरवून दिलेला जमीन महसूल आकारला जाईल व तो महसूल विभागामार्फत वसूल केला जाईल.

**८. तुकडेबंदी कायद्यातून एकवेळची सूट:**

ग्रामदान मंडळाने भूतकाळात जमिनींचे वाटप किंवा विभागणी करताना जर लहान तुकडे केले असतील, तर अशा जमिनींना 'महाराष्ट्र शेतजमीन (तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्याचे एकत्रीकरण) अधिनियम, १९४७' च्या तरतुदींमधून एकवेळची विशेष सूट (One-time exemption) देण्यात येईल, जेणेकरून महसूल नोंदी कायदेशीररित्या पूर्ण करता येतील.

**९. सार्वजनिक आणि सामूहिक जमिनींचे वर्गीकरण:**

सदर अधिनियम लागू होण्यापूर्वीच्या ग्रामदान क्षेत्रातील ज्या जमिनींचा वापर सार्वजनिक कारणासाठी (उदा. रस्ते, सार्वजनिक विहिरी, क्रीडांगण, समाजमंदिर, स्मशानभूमी, गायरान) होत आहे, तसेच, ज्या जमिनी ग्राम मंडळाकडे निहित आहेत, अशा सर्व जमिनी सार्वजनिक वापरासाठी संबंधित ग्रामपंचायतच्या मालकीच्या होतील.

## प्रकरण ४: वाद निवारण, कालमर्यादा आणि अपील तरतूद

### १०. जिल्हाधिकाऱ्यांचे वाद निवारण अधिकार आणि कालमर्यादा:

(१) या अधिनियमांतर्गत जमिनीची पात्रता, वारस हक्क, मालकी हक्कांचे वाटप, मूळ धारणाधिकार निश्चिती किंवा हस्तांतरणाची वैधता याबाबींवरून काही प्रश्न किंवा वाद उद्भवल्यास, संबंधित पक्षकार जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज करू शकतील.

(२) अशा प्रकारचा कोणताही अर्ज किंवा दावा हा अधिनियम लागू झाल्याच्या (नियत दिनांकाच्या) दिनांकापासून शासन विहित करेल अशा मुदतीत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक राहील.

(३) जिल्हाधिकारी, संबंधितांना सुनावणीची वाजवी संधी देऊन, अशा प्रश्नांवर आपला निर्णयात्मक आदेश पारित करतील. जिल्हाधिकाऱ्यांसमोर चालणारे हे कामकाज अर्ध-न्यायिक कामकाज मानले जाईल.

### ११. राज्य शासनाकडे अपीलाची तरतूद:

(१) कलम १० अन्वये जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेली व्यक्ती, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत विभागीय आयुक्त अपील करू शकेल.

(२) अपीलामध्ये विभागीय आयुक्तांचा निर्णय हा अंतिम असेल आणि त्यावर कोणत्याही दिवाणी न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही. तथापि, राज्य शासनास जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त यांचे आदेश फेरतपासणीत घेण्याचे अधिकार राहतील.

## प्रकरण ५: संकीर्ण तरतुदी (वित्तीय व इतर संरक्षण)

### १२. बँकांचे बोजा किंवा गहाण हक्क सुरक्षित ठेवणे:

या अधिनियमांतर्गत जमिनींचे मालकी हक्क किंवा धारणाधिकार बदलले, तरी नियत दिनांकापूर्वी संबंधित जमिनींवर बँका, वित्तीय संस्था किंवा सहकारी सोसायट्यांचे असलेले सर्व वैध कर्जाचे बोजा हक्क जसेच्या तसे कायम राहतील आणि कर्ज वसुलीच्या अधिकारांना कोणतीही बाधा पोहोचणार नाही.

### १३. नोंदणी शुल्क आणि मुद्रांक शुल्कात पूर्ण सूट:

या विशेष निरसन अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी, ग्राम मंडळाकडून मूळ शेतकरी किंवा त्यांच्या कायदेशीर वारस तसेच, जमीन हस्तांतरीत झालेल्या प्रकरणी हस्तांतरीत झालेल्या व्यक्तीच्या अथवा त्यांच्या वारसाचे संबंधित जमिनीच्या महसूल अभिलेखात (७/१२ उताऱ्यात)

नाव नोंदणी करतांना किंवा फेरफार करतांना, संबंधित पक्षकारांना मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी भरण्यापासून पूर्ण सूट देण्यात येत आहे.

**१४. प्रलंबित कायदेशीर बाबी आणि खटले:**

नियत दिनांकापूर्वी ग्रामं मंडळाने किंवा ग्राम मंडळाविरुद्ध सुरू केलेले सर्व कायदेशीर खटले, दावे किंवा अपीले संपुष्टात येणार नाहीत; तर ते संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थे (ग्रामपंचायत/जिल्हा परिषद) द्वारे किंवा त्यांच्याविरुद्ध चालवले जातील.

**१५. अडचणी दूर करण्याचा आणि नियम करण्याचा अधिकार:**

या अधिनियमाच्या उद्देशांची पूर्तता करण्यासाठी शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द करून आवश्यक ते नियम तयार करण्याचे अधिकार राज्य शासनास राहतील.

*****